सकाळ
कोल्हापूर, शुक्रवार, १९ जुलै २०२४

# हृषीकेश कबनूरकरचे फिडे रेटिंग स्पर्धेत यश



हृषीकेश कबनूरकर

**कोल्हापूर :** भोपाळ (मध्यप्रदेश) येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय फिडे रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत हृषीकेश कबनूरकर याने ९ फेरीत ७ गुण मिळवून १९०० रेटिंग गटात उपविजेतेपद पटकावले. त्याला रोख रक्कम व चषक देऊन गौरविण्यात आले. या यशामुळे त्याचे फिडे रेटिंग ७९ ने वाढले आहे. स्पर्धेत एकूण २९७ खेळाडू सहभागी झाले होते. हृषीकेशला बुद्धिबळ प्रशिक्षक कृष्णात पाटील व माधव देवस्थळी यांचे मार्गदर्शन लाभले. तो विवेकानंद महाविद्यालयात बारावीमध्ये शिकत असून, त्याला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखानाप्रमुख प्रा. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, सुरेश चरापले यांचे सहकार्य लाभले.

शुक्रवार, १९ जुलै २०२४

# विवेकानंद कॉलेजमध्ये 'नॅक'बाबत कार्यशाळा

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये आयक्यूएसी आणि इंग्रजी विभागाच्या संयुक्त विद्यमाने प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी 'नॅकला सामोरे जाताना' या विषयावर कार्यशाळा झाली. यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या सॉफ्ट स्कील ट्रेनर डॉ. वैशाली शिंदे यांनी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी गणित विभागप्रमुख प्रा. एस. पी. थोरात होते. आयक्यूएसी विभागाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी प्रास्ताविक केले. इंग्रजी विभागप्रमुख डॉ. कविता तिवडे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. याचे आयोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

रजिस्ट्रार आर. बी. जोग यांनी आभार मानले. सहायक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे, अधीक्षक एस. के. धनवडे, प्रा. माधुरी पवार, प्रा. कोमल व्होनखंडे यांच्यासह प्रशासकीय सेवक उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील यांनी केले.

19/07/2024

19.7.24